# मीलन

माझेच अश्रू माझाच आनंद
त्यात तुझं कधीच नसणं,
ओल्या हुंदक्यांनाही आता
सुचत नाही पुन्हा बरसण.

माझं पडणं, माझं धडपडणं
तुझ्यासाठी ते नुसतंच हसणं
आधाराचा हात माझा
त्याच्या नशिबी ही वाट पहाणं.

माझं असणं, माझं नसणं
फरक काहीच पडत नाही,
माझ्या अस्तित्वाच्या खुणा ही
आता कुठे सापडत नाही.

माझ्यात मात्र तुझं असणं
आणखी एक श्वास जपणं,
पुन्हा नव्याने फुलारताना
तुझी तुला ही ओळख पटणं

तुझ्या मनातील माझी प्रतिमा
एक कोवळी तरल भावना,
अस्तित्व तुझे ही गळून पडता
जाणिवेत पसरली गोड वेदना.

----संध्या रानडे